ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ३९

विद्यानंद देवधर
(इ. ११वी १९७२)
प्रशालेची पहिली तुकडी

दि. २६ सप्टेंबर २०२१

सर्वच कार्यक्षेत्रात 'मानवीसंबंध' व 'मनुष्यबळ विकास' हा अत्यंत महत्त्वाचा विषय आज झाला आहे. नेत्याने स्वत:च्या कर्तव्याच्या बाबतीत कठोर व इतरांबाबत काहीसे उदार असे असावे लागते. त्याला संस्थेची/ कारखान्याची core activity नुसती समजून चालत नाही तर तो त्यात तज्ज्ञ असला पाहिजे तरच त्याच्या शब्दाला किंमत राहील. आपल्या सहकाऱ्यांच्या गुणांचे कौतुक सर्वांसमोर करणे पण उणिवा व्यक्तिगत भेटीतच सांगणे अशी 'संघटन–शास्त्रा'तील महत्त्वाची पथ्ये पाळायलाच लागतात.

आजचे विद्यार्थी–विद्यार्थिनी, त्यांचे प्रश्न, त्यांची आंदोलने हे सगळे १९७०–८० च्या दशकापेक्षा पार वेगळे आहेत. आजचा संदर्भाचा पट जागतिक आहे. आज ट्विटरवरून, सोशल मीडियावरून आंदोलने संघटित करता येतात, लोक ती काही प्रमाणात उचलूनही धरतात! त्यामुळे जागरूकताही वाढली आहे, स्पर्धा तर आहेच. या सर्व कल्लोळात – खरे प्रश्न कोणते, मी काय करायला पाहिजे, त्याचा समाजाला कसा उपयोग होणार आहे, त्या कर्तृत्वात मला समाधान वाटणार आहे का, याचा सारासार विचार युवा पिढीने करायला हवा. प्रबोधिनीने व परिषदेने तो तसा मला शिकवला त्यामुळे ते बीज germ आजपर्यंत टिकून आहे! प्रबोधिनीपासून भौगोलिक अर्थाने मी लांब असलो तरी तो connect आजतागायत तसाच जिवंत आहे. **It is a long lasting bond !**

**जयसिंगपूर ते पुणे**

कोल्हापूर जिल्ह्यात जयसिंगपूर सारख्या छोट्या गावात माझे सुरुवातीचे शिक्षण झाले. वडील सरकारी नोकरीत होते. त्याकाळी गावातील शाळा – 'एक शिक्षकी' म्हणजे प्रत्येक वर्गास एक शिक्षक पण विषयांना वेगवेगळे शिक्षक नाहीत अशा असायच्या. गावातील छोटी शाळा, त्यामुळे शनिवारी मुलांनी गावात फिरून शेण गोळा करायचे व मुलींनी शाळेचे मातीचे वर्ग शेणाने सारवायचे, असा कार्यक्रम असे ! शिक्षक उत्तम होते. त्यावेळचे शाळेतले वातावरण खूप आनंददायी होते. नंतर अनेक वर्षांनी मी कोल्हापूरला आल्यावर माझ्या तेव्हाच्या शिक्षकांना पुन्हा भेटण्याचा योग आला व तोच जुना जिव्हाळा अनुभवला.

**प्रबोधशाळा व प्रशाला**

वडिलांची पुण्यात बदली झाल्यावर तीन वर्षे इ. ६वी ते ८वी मी डेक्कन जिमखाना भावे हायस्कूलमध्ये (सध्याची विमलाबाई गरवारे प्रशाला) होतो. तेथे असताना दरवर्षी प्रबोधिनीतर्फे प्रबोधशाळेत प्रवेशाकरिता वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा/मुलाखती घेतल्या जायच्या. मी ही ती परीक्षा दिली. निवड झाली व अशा रीतीने मला प्रबोधशाळेत प्रवेश मिळाला. प्रबोधशाळा मला खूपच आवडली. दररोज सायंकाळी न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर जमून भरपूर खेळ व्हायचे. कबड्डी, खोखो, आट्यापाट्या, फुटबॉल, व्हॉलीबॉल अशी सगळी धमाल असायची. मग रात्री ७ ते ८.३०-९ पर्यंत शिक्षण. या दरम्यान आम्ही मराठीची प्रज्ञा, हिंदीची कोविद तसेच इंग्रजीच्या परीक्षा दिल्या. शिक्षकवृंद म्हणजे अशोकराव निरफराके, विसूभाऊ गुर्जर, शरदराव सुंकर, विनयराव हर्डीकर, आनंदराव हर्डीकर. यातल्या बहुतेकांबरोबर आम्ही संध्याकाळी मैदानावर खेळायचो. शिवाय मा. आप्पा, मा. आण्णा, मा. यशवंतराव यांचेही तास असायचेच. आता अनेकदा मुक्कामाला प्रबोधिनीत जाणे सुरू झाले होते. वेगवेगळे उपक्रम, गणपती विसर्जन मिरवणुकीत सहभाग, एक ना अनेक ... असं आठवतंय, की आम्ही कायम कशात तरी गुंतलेलो असायचे. त्यावेळी आम्ही अगदी 'प्रबोधिनीमय' होऊन गेलो होतो.



**ज्ञान प्रबोधिनीची सुरुवात (परांडे वाडा)**

त्याचवेळी प्रशाला सुरू करायची सगळी तयारी सुरू झाली होती. तीन वर्षांनंतर जेव्हा प्रशाला सुरू होण्याचे नक्की झाले; त्यावर्षी वडिलांची पुन्हा कोल्हापूरला बदली झाली. पण माझ्या दृष्टीने प्रशालेतच शिकणे हा माझा अगदी obvious choice होता. त्यामुळे घरी हट्ट करून, मला पुण्यातच शिकायचे असे सांगितले व अशा प्रकारे मी पूर्णवेळच्या प्रशालेत दाखल झालो.



**ती. गोपाळराव**

एव्हाना घरचे सगळे कोल्हापूरला गेले होते. त्यामुळे राहायचे कुठे हा प्रश्न होता. सुरुवातीला चार-सहा महिने आप्पांच्या म्हणजे प्रबोधिनीच्या जुन्या वास्तूमध्ये (परांडे वाडा, आत्ताचे विनायक भवन) राहण्याची व्यवस्था ती. आप्पांनी केली. व नंतर आण्णांच्या घरी (स.प. महाविद्यालयामागे कुठेतरी त्यांचा फ्लॅट होता असे अंधुकसे आठवते) काही महिने राहिलो व नंतर ११वी, सीबीएसई परीक्षा होईपर्यंत माझ्या मामांच्या घरी राहिलो. परांडे वाड्यात ती. आप्पा, ती. आण्णा, ती. गोपाळराव आणि आम्ही काही जण रहायचो. त्यावेळची अजून लक्षात राहिलेली एक मजेशीर आठवण म्हणजे तिथे दूधासाठी स्वयंपाक घरामध्ये एक जाळीचे कपाट होते. त्यामध्ये आम्ही जितके जण रहायचो त्या प्रत्येकासाठी वेगळे भांडे असायचे. जेवढी माणसे तेवढी छोटी-छोटी भांडी. ज्याचे त्याने आपापले दूध संपवायचे! पहिल्या मजल्यावर रस्त्याच्या बाजूची खोली आप्पांची उपासनेची खोली होती. आम्ही त्यांच्याबरोबर उपासना करायचो हेही आठवते.

**प्रशालेची पहिली तुकडी – प्रयोगशील शिक्षणातील संस्मरणीय प्रसंग**

साधारण तीन वर्षे मी प्रबोधशाळेत होतो. खेळ हा सर्वांना एकत्र आणणारा दुवा होता. त्यामुळे मजा यायची. त्यामुळे आमचे एकमेकांतील बाँडिंग खूप छान झाले. प्रबोधिनीने आता प्रशाला सुरू करायचे ठरवले तेव्हा आम्ही ठरवले की आपण याच शाळेत प्रवेश घ्यायचा. आमची प्रशालेची पहिली तुकडी ! वर्गात आम्ही चौदा विद्यार्थी. मी व शिवराम परांजपे पुण्याबाहेरचे. त्यामुळे आमच्या दोघांवर जास्त लक्ष आणि जरा लाडही व्हायचे. प्रबोधिनीत सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत सर्वांचा जणूकाही दुसऱ्या घरासारखा मुक्काम असायचा. रात्रीही अनेक युवक कार्यकर्ते प्रबोधिनीत रहायला यायचे.

प्रशालेतील अनेक अनुभव आजही स्मरणात आहेत. त्यावेळेस रसायन प्रयोगशाळेमध्ये फर्निचर सुतारांच्या बरोबर थांबून करून घेतले होते. कारण ती. आप्पांनी आमच्या वर्गास सांगितले, की ''जवळच्या फर्गसन व गरवारे कॉलेजच्या

प्रयोगशाळा पाहून या, तेथील फर्निचर बघून त्यांची मापे घ्या व त्याप्रमाणे नंतर वास्तूत असलेल्या प्रशिक्षित सुतारांकडून तशी टेबल्स बनवून घ्या !''

आम्हाला फिजिक्स शिकवायला प्रा. श्याम आफळे होते. त्यांची आठवण - एक दिवस आम्हा सर्वांना ते गच्चीवर, सूर्योदयाच्या वेळेस घेऊन गेले. सूर्योदय होत असताना त्यांना उत्स्फूर्तपणे कविता सुचली ती त्यांनी म्हणून दाखविली. (प्रा. आफळे नंतर स.प.महाविद्यालयात अध्यापक होते. नंतर ते पूर्णवेळ लेखनाकडे वळले. त्यांना नंतर 'उत्सुकतेने मी झोपलो' या पुस्तकासाठी २००८ साली साहित्य अकादमीचा पुरस्कार व आणखी अनेक पुरस्कार मिळाले.) आफळे सरांची फिजिक्स शिकवण्याची पद्धत एकदम मजेशीर होती. प्रत्येक तासाच्या आधी ते पुढच्या तासाचा विषय सांगत. उदा. मॅग्नेटिझम - त्यावर प्रत्येकाने घरी वाचून, अभ्यास करून यायचे. मग त्या टॉपिकवर वर्गात चर्चा व्हायची. ते आमच्या वर्गात आले की प्रथम वर्गाची रचना बदलून घ्यायचे. सर्वांनी गोलाकर टेबल-खुर्च्या मांडून बसायचे व मग ग्रुप डिस्कशन पद्धतीने 'मॅग्नेटिझम' वर चर्चा व्हायची! अशा तऱ्हेने फिजिक्स शिकवणारे शिक्षक विरळाच !




**प्रा. श्याम मनोहर (आफळे)**

श्री. केतकर या नावाचे जीवशास्त्राचे शिक्षक होते. त्यांचे स्वतःचे शनिवार पेठेत संधीपादकीटक संग्रहालय होते. त्यांनी आमच्या इतर विषयांच्या शिक्षकांशी बोलून आठवड्यातून शनिवारी फक्त जीवशास्त्र असे ठरवून घेतले होते. शनिवारचा जीवशास्त्राचा दिवस सुरू व्हायचा भल्या सकाळी हनुमान टेकडीच्या पायथ्याशी. येताना सर मायक्रोस्कोप, डिसेक्शन ट्रे, इ. साहित्य घेऊन यायचे. मग टेकडी चढत-चढत आमचा परिसर अभ्यास सुरू व्हायचा. तेथून आम्हा सर्वांना घेऊन, टेकडीवर जाईपर्यंत वाटेतील पक्षी, फुले, पाने, कीडे यांची निरीक्षणे करीत जायचे. सर खूप वेगवेगळी माहिती द्यायचे. मधेच पानाचा सेक्शन घे किंवा बेडकाचे डिसेक्शन कर .. मायक्रोस्कोपखाली दाखव असे करत आमचा वर्ग चालायचा. जीवशास्त्राचा अभ्यास कधी संपायचा हेही कळायचे नाही. शिक्षण पद्धतीत या पद्धतीला काय म्हणतात माहीत नाही पण त्यातून जे ज्ञान आम्हाला मिळाले त्याला तोड नाही. आमच्यापैकी जे पुढे मेडिकलला गेले त्यांना हे शिक्षण मेडिकल कॉलेजमध्येही उपयोगी पडले.

हिंदीसाठी सुश्री दुर्गा दीक्षित मॅडम व बात्रा सर, यांनी शिकवलेल्या अनेक कविता, रामधारीसिंह दिनकर यांची 'रश्मिरथी' तसेच इंग्रजीच्या पटवर्धन सरांचा correct pronounciation चा आग्रह व त्यासाठी ते घोकून घेणे या सर्वांच्या आठवणी अजून आहेत. 'परिस्थिती ज्ञान'च्या तासाची आम्ही नेहमी वाट पहायचो. कारण त्या तासाला आम्हाला माहीत नसलेली कितीतरी माहिती मिळायची.

प्रत्येक शिक्षकाची अशी विशेष शासियत असायची. विनयराव हर्डीकर, आनंद हर्डीकर, अशोकराव निरफराके, विसूभाऊ गुर्जर हे सर्व रूढार्थाने 'शिक्षक' नसले तरी आमचे शिक्षकच होते. आजच्या भाषेत त्याला आपण अधिमित्र (Mentor) म्हणतो. त्यांच्यापैकी अनेकांचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू असताना त्यांच्या सहवासाचा व मार्गदर्शनाचा लाभ आम्हाला मिळत होता. (आनंदराव हर्डीकरांच्या कुठल्या तरी पुस्तकावर बंदी आली होती त्यावेळी मिळालेल्या प्रसिद्धीने त्यांना खूपच आनंद झाला होता हे आठवते)



**प्रा. विसूभाऊ गुर्जर**

आमची पहिलीच तुकडी, सीबीएसईची परीक्षा हिंदीतून द्यायची, त्यामुळे संस्कृत हिंदीतून शिकलो ! संस्कृत थोडे कच्चे राहिले पण हिंदी मात्र पक्के झाले ! प्रबोधिनीच्या या प्रयोगशाळेतून - Learning while doing - आही घडत गेलो. आप्पांचा स्वभाव हा प्रयोगशील होताच, त्याचेच प्रतिबिंब प्रबोधिनीच्या सुरुवातीच्या अनेक वर्षांमधील वाटचालीत दिसले.

शाळेनंतर पुणे सुटले ते कायमचेच. पण प्रबोधिनीशी नाते तसेच घट्ट राहिले. कधीही पुण्याला आलो तरी प्रबोधिनीत जाणे व्हायचे. अनेकदा गिरीशरावांची भेट व्हायची. एक-दोनदा निगडीस जाणे झाले. मागे एकदा मा. आण्णा व मा. लताताई त्यांच्या काही कार्यक्रमाच्या निमित्ताने कोल्हापूरला आले होते तेव्हा मला भेटायला माझ्या कारखान्यात आले. माझ्यासाठी तो स्पेशल दिवस होता. मग मी त्यांच्या आग्रहाप्रमाणे नंतर दोन दिवस हराळीलाही जाऊन आलो. मा. यशवंतरावांनी बेळगावला श्री. भीमराव गस्ती यांच्याकडे जाताना एक-दोनदा निरोप पाठविला होता. मग त्यांच्याबरोबर बेळगावला गेल्याचेही आठवते. ४७ वर्षांनंतर प्रशालेच्या ५०व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने २०१९ मध्ये आम्ही १४ वर्गमित्र भेटलो. वर्षांचे अंतर पडले होते पण जणूकाही कालच एकत्र होतो, असे वाटून गप्पांना सुरुवात झाली.

## आय.आय.टी. तील शिक्षण

इ. ११वीची सीबीएसई ची परीक्षा दिल्यानंतर पुढे इंटर सायन्सच्या शिक्षणासाठी मी कोल्हापूरला म्हणजे घरी आलो. शाळकरी वयात माझ्याच हट्टापोटी मी घर सोडून पुण्यात राहिलो होतो. त्यामुळे 'आता घरी ये' असा घरातील सर्वांचाच आग्रह होता. याच वर्षी मला 'अभाविप' या विद्यार्थी संघटनेची ओळख झाली. (त्याविषयी पुढे सांगणार आहेच)

१९७३ साली आयआयटी प्रवेश परीक्षा (JEE) उत्तीर्ण होऊन मुंबई आयआयटीमध्ये केमिकल इंजिनीअरिंगला (ही त्यावेळची सर्वात डिमांडमध्ये असलेली ब्रांच होती) प्रवेश घेतला. आयआयटीतील शिक्षण म्हणजे माझ्यासारख्या लहान गावातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी (अर्जुनाला 'विश्वरूपदर्शन' होण्यासारखा) प्रचंड वेगळा अनुभव होता. एकतर सगळेच so-called हुशार – म्हणजे आपापल्या वर्गात नंबरात येणारी मुले. तिथे आल्यावर आपली खरी 'ओळख' झाली. अनेक वरवर 'छछोर' वाटणारी मुले किती ब्रिलियंट आहेत ते पाहिले. त्यामुळे दिसण्यावरून एखाद्याबद्दल निष्कर्ष काढणे किती फसवे असते ते कळले. आयआयटीतील वास्तव्याचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे बहु-भाषी, बहु-धर्मी, बहु-प्रांतीय मित्र मिळाले. त्यावेळी आमचे अनेक मित्र पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेले ते नंतर २०-२५ वर्षांनंतरच भेटले. (त्यावेळी मोबाईल नसल्याने एकदा भारताबाहेर गेल्यावर पुन्हा संपर्क जवळजवळ अशक्यच होता) आमच्या बरोबरीचे अनेक जण आज अतिशय उच्च पदावर काम करून निवृत्त झाले आहेत. अनेकांची बौद्धिक प्रतिभा तंत्रज्ञान सोडून इतरही अनेक दिशेने चालायची. माझा आयआयटीतील जवळचा मित्र मनोहर पर्रीकर नंतर गोव्याचा मुख्यमंत्रीही झाला. याच दरम्यान आणीबाणी आली ... पण त्याविषयी पुढे सांगतो.

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) ची ओळख

कोल्हापूरच्या एका वर्षाच्या वास्तव्यातील माझ्या पुढील आयुष्यावर दीर्घकाळ परिणाम करणारी घटना म्हणजे याच वर्षी माझा 'अभाविप'शी संबंध आला. ही माझ्या दृष्टीने महत्त्वाची एवढ्यासाठी, की पुढील जवळजवळ १२-१५ वर्षे माझे भावविश्व या विचाराने, वातावरणाने व तेथील सहकाऱ्यांबरोबर व्यापून गेले. त्या एका वर्षात – असे म्हणायला हरकत नाही की – मी फक्त अभाविपचे काम एवढेच केले. कॉलेजमध्ये जेमतेमच तासांना बसायचो, बाकी सर्ववेळ विद्यार्थी परिषदेच्या कामासाठी. अनेक कार्यक्रम, शिबिरे, जाहिराती गोळा करणे, आंदोलने करणे, कुलगुरूंपासून शिक्षण श्रेत्रातील अनेत मोठ्या व्यक्तींशी भेटी अशा सर्व गोष्टीत मी अगदी बुडून गेलो होतो (अशा 'शिक्षणेतर' अनेक गोष्टीत लुडबुड करण्याची प्रबोधिनीतील पार्श्वभूमी होतीच) स्वाभाविकच आयआयटी मुंबईमध्ये प्रवेश मिळाल्यावरही ते काम चालूच राहिले.



**अभाविप मधील दिवस – डॉ. विनय सहस्रबुद्धे व ॲड. विनय नवरे व अन्य मित्र**

आयआयटीत प्रवेश घेतल्यावर मला विद्यार्थी परिषदेचे काम करायला आणखीनच संधी मिळाली कारण अभाविपचे केंद्रीय कार्यालय मुंबईलाच होते. त्यामुळे दर शनिवार-रविवारी मुंबईला विद्यार्थी परिषदेच्या कार्यालयात जाणे सुरू झाले. मुंबईतच अनेकदा काही ना काही कारणाने संघटनेतील देशभरातील अनेक कार्यकर्ते यायचे त्यांच्याशी जवळून मैत्री झाली. आयआयटीची पाच वर्षे, नंतर चार वर्षे पूर्ण वेळ काम व नंतर आणखी चार वर्षे जवळ-जवळ पूर्णवेळ सारखेच काम अशी तेरा वर्षे माझा अतिशय जवळून अभाविपशी संबंध आला. १९७५-७६ हा आपल्या देशाच्या राजकीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा कालखंड होता. आणीबाणी जाहीर झाली होती. पण त्याच्या सुरुवातीच्या काळातील घटना म्हणजे बिहार व गुजराथमधील विद्यार्थ्यांच्या नेतृत्वासाठी सुरू झालेले नवनिर्माण आंदोलन. जयप्रकाश नारायण यांच्या त्यातील सहभागाने व नेतृत्वाने हे आंदोलन देशव्यापी झाले. या आंदोलनात नेतृत्व करीत असलेले विद्यार्थी नेते अनेकदा मुंबईला यायचे. त्यांच्याशी खूप गप्पा व्हायच्या.

आयआयटीत प्रत्येक सेमिस्टर संपल्यावर मोठी सुट्टी असे. डिसेंबर व उन्हाळ्यामध्ये दीड-दोन महिने सलग सुट्ट्यांचे मिळायचे. प्रत्येक सुट्टीत मी कोल्हापूरला यायचो व माझे परिषदेचे काम अधिक जोमाने व्हायचे. बऱ्याचवेळा कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करणे, आंदोनलात पुढे असणे, इ. मुळे पत्रकार, पोलीस अशांशी संबंध यायचाच. त्याचा परिणाम म्हणजे जेव्हा आणीबाणी आली तेव्हा आणीबाणीच्या काळात दोनही सुट्ट्यांमध्ये मला तुरुंगात जावे लागले. (ॲक्टिव्हिस्ट म्हणून मुंबईहून येऊन मी कोल्हापूरला पत्रके वाटतो, सभा घेतो अशी स्थानिक पोलीसांची शंका होती.) खरंतर दुसऱ्यांदा सुट्टीत आल्यावर असे ठरले होते, की मी 'अटक करून घ्यायची नाही व सत्याग्रह करायचा'. पोलीसांना चुकवण्यासाठी सत्याग्रहापूर्वी एका सिनेमाला जाऊन थिएटरमध्ये वेळ काढायचा असे ठरवले. पण पोलीस मागावर होते. त्यांनी मध्यंतरात सिनेमागृहातून पकडून नेले. दीड महिन्यांनी आयआयटीच्या संचालकांनी पोलिसांना पत्र दिल्यावर सुट्टी संपताना मला सोडण्यात आले. या सर्व पार्श्वभूमीवर शिक्षण संपल्यावर मी पूर्णवेळ संघटनेचे काम करणार हे मी व इतर सर्वांनीच गृहीत धरले होते.

**संघटनेचे पूर्णवेळ काम**

आयआयटी परीक्षा उत्तम पद्धतीने उत्तीर्ण झालो. कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये एक जॉब मिळाला होता. पण नोकरी करायचीच नव्हती. घरच्यांचा अर्थातच विरोध होता. त्यांची अपेक्षा की सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबाप्रमाणे मी नोकरी करून आयुष्यात स्थिरस्थावर व्हावे. मला परिषदेच्या कामाशिवाय दुसरे कोणतेच प्राधान्य वाटत नव्हते. पूर्णवेळ काम करण्याचीच फक्त झिंग होती. ती एकप्रकारची मानसिक अवस्थाच असते. कोणतीही व्यक्तिगत आशा-आकांक्षा, personal agenda न ठेवता समाजासाठी संघटनेत काम करणे, हा एक वेगळाच अनुभव असतो. कसलेही मानधन न घेता संघटना सांगेल तेथे व सांगेल ते काम करणे म्हणजे पूर्णवेळ काम करणे. अनेकांना आम्ही असे करतो हे पटायचेच नाही.

मुंबईत पूर्णवेळ काम करत असताना महानगराचा मंत्री, संघटनमंत्री अशा अनेक जबाबदाऱ्या वेळोवेळी आल्या. अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय परिषदा मुंबईत भरल्या, त्यांचे संयोजन करण्याची संधी मिळाली. परिषदेचा अनेक वर्षे Students Exchange in Interstate Living (SEIL) हा सेतुबंधनाचा कार्यक्रम चालू आहे. पूर्वांचल व विशेषतः अरुणाचल प्रदेशातील अनेक विद्यार्थी महिनाभर मुंबईत/महाराष्ट्रात राहण्यास येतात, आपले विद्यार्थी तेथे जातात. एकदा अशा या दौऱ्यात SEIL कार्यक्रमातूनच पूर्वी काही वर्षे मुंबईत शिकायला आलेले व नंतर अरुणाचलचे कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झालेले श्री. गेगोंग अपांग मुद्दाम पुन्हा एका विद्यार्थ्यांच्या ग्रुपबरोबर आले होते. अरुणाचलात ते मंत्री असूनही पूर्ण मुंबई-गोवा दौऱ्यात आमच्याबरोबर ते बसने प्रवास करत होते. एखाद्या प्रकल्पाचा एखाद्या व्यक्तीवर किती प्रभाव पडू शकतो त्याचे ते जिवंत उदाहरण आम्ही अनुभवले.

असे अनेक अनुभव गाठीशी जमा झाले. अभाविपच्या अनेक अखिल भारतीय स्तरावरील बैठका मुंबईत होत असत. एखादी देशव्यापी संघटना कशी चालविली जाते त्याचं तो एका अर्थाने वस्तुपाठच होता. विद्यार्थी परिषदेच्या सैद्धांतिक कामाची मांडणी प्रा. यशवंतराव केळकर व प्रा. बाळासाहेब आपटे यांच्यासारख्या दिग्गजांनी केली. त्यांच्या मार्गदर्शनातून खूप काही शिकण्यास मिळाले.

प्रा. यशवंत केळकर हे संघटन शास्त्रातील खूप मोठे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्याबरोबर तीन वर्षे जवळजवळ रोज काम करायची संधी मला मिळाली हे माझे मोठे भाग्य! अनेकदा खूप मोठी माणसे आपण त्यांच्याजवळ गेलो की खुजी वाटायला लागतात. मा. यशवंतराव त्याला अपवाद होते. जेवढे त्यांच्या जवळ जावे तेवढे ते अधिकच थोर वाटायचे. प्रबोधिनीचे मा. आप्पा, आण्णा यांच्यासारखी ही सर्व व्यक्तिमत्त्वे मोठठ्या उंचीची होती. प्रसिद्धीच्या वलयात वा प्रकाशझोतात ते कधीही नव्हते पण आपापल्या क्षेत्रात, त्या-त्या ठिकाणी खंबीरपणे उभ्या असलेल्या अशा दीपस्तंभासारख्या कार्यकर्त्यांमुळेच अशी मोठी कार्ये उभी राहिली. माझ्या सुदैवाने मला अशा अनेकांचा जवळून सहवास लाभला.

**मी एक Reluctant Entrepreneur ! परिषद कार्यकर्ता ते उद्योजक**

अभाविपचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करायचे मी १९८८ मध्ये थांबवले. हा निर्णय काहीसा मनाविरुद्धच होता पण माझ्या काही आजारपणामुळे मला थांबायला लागले. मुंबई सोडून मी कोल्हापूरला परतलो. केमिकल इंजिनीअरिंगचा अभ्यासक्रम पूर्ण होऊनही बराच कालखंड झाला होता. व्यावहारिक जगाशी कसलाच संबंध राहिला नव्हता. माझे बँकेत व्यक्तिगत खातेही नव्हते. पण आता अर्थाजनासाठी काहीतरी काम करणे जरूरीचे होते. नोकरी मिळविण्यासाठी रूढार्थाने माझ्या सीव्हीवर तसा काहीच अनुभव जमा नव्हता. उलट 'ॲक्टिव्हिस्ट' असण्याचा एक नकारात्मक शिक्का होता. मग मी दोन-तीन महिन्यांच्या छोट्या-छोट्या तीन नोकऱ्या करून माझा एक पाच वर्षांचा सीव्ही तयार केला व नोकरीसाठी वेगवेगळ्या ठिकाणी मुलाखतीही दिल्या. अभाविपचे काम करण्याने मी versatile झालो होतो. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी लगेचच त्या-त्या जबाबदारीचा आवाका यायचा. त्याचवेळी माझ्या एका बालमित्राने (तो लॉ कॉलेजला शिकवायचा व नंतर टीचिंग सोडून 'रेडक्रॉस' चा संपूर्ण दक्षिण-पूर्व आशिया, आफ्रिका, इ. देशांचा प्रमुख होऊन निवृत्त झाला) सुचवले की (मी व्यवसाय, सामाजिक काम इ. सर्व करायचे ठरवल्याने) कायद्याचे शिक्षण घ्यावे, म्हणून एलएलबीची परीक्षाही दिली. विद्यापीठात लॉ डिग्री संपादन करीत दुसरा क्रमांक मिळविला. तरी पुढे नक्की काय करायचे, याची निश्चिती होत नव्हती.



**ऑस्ट्रेलियातील एका कुटुंबाबरोबर**



**ऑस्ट्रेलियातील दोन महिने**

दरम्यान रोटरी क्लबतर्फे Group Study Exchange प्रकल्पांतर्गत आस्ट्रेलियात दोन महिने जाऊन, तेथे विविध कुटुंबात राहून, विविध उद्योग, शिक्षण संस्था, इ. यांचा अभ्यास करणे अशा एका योजनेची जाहिरात आली. अशा सर्व विषयांतील माझा अनुभव पाहून व एकूण मुलाखत चांगली झाल्याने पाच जणांच्या टीमचा लीडर म्हणून माझी निवड झाली.

ती शिष्यवृत्ती संपवून परत येताना सिंगापूरला एका मित्राकडे पंधरा दिवस थांबलो. त्यांच्याबरोबर सिंगापूरमधील एका उत्तर भारतीय समाजाच्या संमेलनात जायचा योग आला. मग तेथे ओळख झालेल्या एका कापड उद्योगातील प्रसिद्ध (भारतीय) उद्योजकांचा व्यवसाय/कारखाना बघण्यास गेलो. तेथे दोन असेंब्ली लाईनसाठी एकत्र मशीन रुळांवरून शिफ्ट करून दोन्हीकडे वापरले जात होते हे मला फारच इंटरेस्टिंग वाटले. त्यातून मला माझ्या पुढच्या व्यवसायाची कल्पना सुचली. ती म्हणजे Trolley Mounted Racks ज्यामुळे जागेची बचत करून systematic storage करता येईल अशी कल्पना होती.

कोल्हापूरला परतल्यावर कुटुंबाच्या एका परिचित उद्योजकांना ही कल्पना सांगितली. त्यांनाही कल्पना आवडली. पण 'तू उद्योगात बरोबर यायला तयार असशील तरच हा उद्योग सुरू करायचा' अशी त्यांनी अट घातली. व अशा तऱ्हेने काहीही ध्यानीमनी नसताना मी एक (reluctant) उद्योजक झालो. ते व त्यांचे आणखी एक उद्योजक मित्र हे दोन व मी तिसरा संचालक म्हणून प्रायव्हेट लिमिटेड कंपनी सुरू केली. त्या दोघांची कौटुंबिक पार्श्वभूमी उद्योगाचीच होती. मी पूर्णपणे नवखा ! अगदी अनपेक्षितपणे उद्योगात आलो होतो. आमचे ठरले की व्यवसायाचे दैनंदिन कामकाज मी पाहायचे व आर्थिक बाजू त्या दोन सिनीअर संचालकांनी सांभाळायची. या प्रॉडक्टसाठी ग्राहकांचा शोध सुरू केला तेव्हा मला लक्षात आले की जेथे जागेच्या किंमती सर्वात महाग, तेथे आमचे हे प्रॉडक्ट उपयोगी ठरणार ! त्यामुळे मुंबईकडे प्रयत्न करायचे असे ठरले. परिचितांपैकी एक जण मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये वरिष्ठ अधिकारी होते. त्यांना मुंबईला जाऊन भेटलो, सर्व कल्पना समजून सांगितल्या. माझगाव, वडाळा, शिवडी, इ. ठिकाणी पसरलेल्या मुंबई पोर्ट ट्रस्टची मुंबईत तीन प्रचंड मोठी गोडाऊन्स होती. त्यांच्या सर्व जागांचा व गरजांचा तीन दिवस अभ्यास करून त्यांच्या त्यावेळच्या उपलब्ध असलेल्या जागांपैकी १/३ जागेतच स्टोअर्सचे सर्व सामान बसू शकेल, असा त्यांना रिपोर्ट दिला. हे त्यांना खूपच आकर्षक प्रपोजल वाटले. त्यांना ते पटले आणि दोन लाखांची ट्रायल ऑर्डर घ्या, एकदा ती झाली की मग भरपूर काम मिळेल – असे त्यांनी आश्वासन दिले व ती ट्रायल ऑर्डर घेऊनच मी कोल्हापूरला परतलो.



**उद्योजकतेत वळणावळणाचा प्रवास**

आल्याबरोबर एकीकडे उत्साहाने कामाला सुरुवात केली आणि महिन्याभरात त्या अधिकाऱ्यांनी तार पाठवून कळविले की दिलेली मागणी रद्द करीत आहोत ! (मुंबई पोर्ट ट्रस्टच्या इतिहासात दिलेली ऑर्डर रद्द होणे ही अगदी दुर्मिळ गोष्ट होती). हे का झाले ते आम्हाला काहीच कळेना ... नंतर कळले की उत्साहाच्या भरात त्यांनी या सिस्टीमचे एवढे गुणगान केले – खूप जागा वाचणार, खूप कमी लोकांच्यात काम होणार इ. इ– की या नवीन स्टोरेज सिस्टीममुळे बऱ्याच जणांच्या नोकऱ्या जातील अशी अफवा तिथे पसरली. अशा अफवेतून तेथील कामगार संघटनेने आंदोलन केले – संप केला व मागणी केली की नवीन स्टोरेज सिस्टीम आम्ही येऊ देणार नाही ! खरंतर असे काही होणार नव्हते, जागेची मोठी बचतच होणार होती व कोणाच्याही नोकऱ्या जाणार नव्हत्या. पण दुर्दैवाने ती ऑर्डर पोर्ट ट्रस्टने रद्द केली. इकडे आम्ही रॉ मटेरिअल खरेदी करून काम सुरू केले होते, बँकेकडून कर्जही काढले होते. हे सर्व पाहून आमच्या दोन सिनिअर संचालकांनी कंपनी सोडायचा निर्णय घेतला. ते व्यवसायातून बाजूला झाले. बँक अधिकाऱ्यांनी मला 'तुम्ही उद्योग चालवा .. आम्ही सर्व सहकार्य करू, परंतु तुम्हाला उद्योगातून निवृत्त व्हायला आम्ही परवानगी देणार नाही कारण हा उद्योग तुमच्यावरच अवलंबून आहे' असे सांगितले व मला माझ्या नकळत उद्योजक बनविले. माझ्याकडे तारण ठेवायला काहीच नव्हते. घरी असल्या प्रसंगाची कोणाला सवय नव्हती. नशिबाने आणखी एका परिचितांनी त्यांची खासगी मालमत्ता बँकेकडे माझ्या व्यवसायासाठी तारण दिली व उद्योग पुढे चालवायचे ठरविले. अर्थात पर्याय नव्हताच. माझ्या सांगण्यावरून तीन–चार जणांनी आधीच्या नोकऱ्या सोडून आमच्याकडे काम सुरू केले होते.

एव्हाना १९८८ साली माझे लग्न झाले होते. मी अजून आर्थिकदृष्टया सेटल नव्हतो. व्यवसाय नुकताच सुरू केला होता. त्यात या अडचणी. सुदैवाने पत्नीच्या माहेरी व्यवसायाचे वातावरण असल्याने तिला या चढ–उतारांची जाणीव होती. हा सर्व कालखंड म्हणजे १९९२ ते १९९४ च्या सुमाराचा. १९९४ च्या जानेवारीत मी दिल्लीला एका प्रदर्शनासाठी जाणार होतो. रात्रीची फ्लाईट होती. मुंबई विमानतळावर दिल्लीसाठी जाणाऱ्या विमानातच बसून होतो. पण दिल्लीला धुके असल्याने उशीर होत होता. अचानक मला श्वास घ्यायला त्रास व्हायला लागला. छातीवर प्रचंड प्रेशर आले. मी खूप थकलो होतो. तसाच रात्रभर बसून राहिलो. सकाळी दिल्लीत उतरल्यावर स्वतःच सामान उचलून मावस भावाकडे गेलो व बेशुद्ध पडलो. तेव्हा मोबाईल इ. काही नव्हतेच. भावाने मला थेट रुग्णालयात नेले. हृदयविकाराचा झटका येऊन गेला होता. रात्रभर उपचार न झाल्याने हृदयात थोडा बिघाडही झाला होता. तीन दिवस क्रिटिकल होते. नंतर चार महिने मला दिल्लीतच रहावे लागले. एवढ्यात बायपास सर्जरी करू नये असा सल्ला डॉक्टरांनी दिला त्यामुळे आहारावर खूप नियंत्रण आले.

परत आल्यावर मात्र मी ठरविले की आता उद्योग सांभाळून काम करावे लागेल पण व्यवसायाकडे १००% लक्ष देऊन

करायला लागेल हे ही लक्षात आले. पर्याय तरी कुठे होता? मग मी त्यात पूर्णपणे उतरलो. अकौंटींग पासून सर्व आवश्यक गोष्टी शिकून आत्मसात केल्या. इतके दिवस अभाविपच्या DIPEX प्रदर्शनांमधून व उद्योजकता शिबिरातून 'नोकरी करणारे' होऊ नका, 'नोकरी देणारे व्हा' हा संदेश आम्ही देत होतो, तो स्वतःच आचरणात आणायची वेळ आली होती! एकूण घरच्या कोणालाच माझ्या व्यवसायातील काही माहीत नसल्याने, माझ्या तब्बेतीची अडचण लक्षात घेऊन, कॅशक्रेडिट सोडून इतर कोणतेही कर्ज न काढता उद्योग पुढे चालवायचे ठरले. हळहळू व्यवसाय स्थिरावला. मग २००७-०८ मध्ये दक्षिण महाराष्ट्रात सरकारला सर्वात जास्त एक्साईज कर देणारा लघुउद्योग म्हणून आमच्या उद्योगाचा सन्मानही झाला ! प्रामाणिकपणे व्यवसाय केल्यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद व पाठिंबा मिळत गेला. व्यवसाय वाढत असताना, तो कर्जमुक्तही केला. सचित भांडवलात वाढ करीत गेलो.


भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
वित्त मंत्रालय
MINISTRY OF FINANCE
राजस्व विभाग
DEPARTMENT OF REVENUE
केन्द्रीय उत्पाद शुल्क, सीमा शुल्क तथा सेवा कर
CENTRAL EXCISE, CUSTOMS & SERVICE TAX

सम्मान पत्र
SAMMAN PATRA

यह सम्मान पत्र मेसर्स सुर्या इक्विपमेंट, गोकुल-शिरगांव, कोल्हापूर को वर्ष २००७ में केन्द्रीय उत्पाद शुल्क राजस्व के उल्लेखनीय योगदान के लिए प्रदान किया जाता है।
This samman patra is awarded to M/s. Surya Equipment, Kolhapur for their outstanding contribution to Central Excise revenue during the year 2007.

पुणे
Pune
Date : 22nd February, 2008


(राकेश शर्मा)
(RAKESH SHARMA)
मुख्य आयुक्त, पुणे क्षेत्र
CHIEF COMMISSIONER, PUNE ZONE



**आता थोडे आमच्या उद्योगाविषयी** – आमच्या उद्योगाचे नाव 'सूर्या इक्विपमेंटस् प्रा. लि.' असे आहे. आम्ही प्रामुख्याने 'Industrial Storage' या विषयात काम करतो. आमच्या मुख्य उत्पादनांमध्ये Mobile Storage Systems (manual & motorised), Vertistore, Radio-shuttle, ASRS (Automated Storage & Retrieval Systems) इ. आहेत. याकरिता फॅब्रिकेशन, पावडर कोटिंग, इलेक्ट्रिकल व कंट्रोल्स, मशिनिंग, इ. कामे वेगवेगळ्या युनिटस्‌मध्ये केली जातात. सर्व सुटे मटेरिअल (सब-असेंब्लीज) कोल्हापूरातील आमच्या मॅन्युफॅक्चरिंग युनिटस् मधून भारतभर (क्वचित भारताबाहेर) पसरलेल्या ग्राहकांच्या साईटस्‌वर ट्रक्स मधून पाठवले जाते. नंतर तेथे आमच्या साईटटीम्स जातात व सर्व स्टोरेज सिस्टीमची जोडणी पूर्ण होते. हे काम दोन-तीन आठवड्यात पूर्ण होते. या आमच्या व्यवसायामुळे साधारण ५०-६० जणांना थेट रोजगार व साधारण २०० कामगारांना नियमितपणे अप्रत्यक्ष पद्धतीने अनेक वर्षे रोजगार मिळालेला आहे. आमची वार्षिक उलाढाल साधारण रु.३० कोटींची आहे.

**व्यवसायाची उत्पादने**







**आमची टीम**

पु





गेली ३-४ वर्षे माझा मुलगा व्यवसायात आला आहे. हळूहळू पुढच्या पिढीकडे जबाबदाऱ्या द्यायला मी सुरुवात केली आहे. एकीकडे ही 'निवृत्ती'ची योजना डोळ्यासमोर असताना आम्ही उद्योगातील काही मित्रमंडळी एकत्र जमून आमच्या पुढच्या पीढीतील मुला/मुलींकडे व्यवसाय सोपविताना काय-काय करायला लागते, त्याचे मेंटॉरिंग कसे करता येईल यावरही ॲक्शन प्लॅन तयार करीत आहोत.

हळूहळू माझ्या पेंटिंगपासून, वाद्य- वादन, मूर्तीकला असा छंदांसाठी वेळ द्यायचा विचार आहे. गेली २२-२३ वर्षे आम्ही दरवर्षी गणपतीची शाडू माताची मूर्ती घरीच तयार करतो. शिवाय वेगवेगळ्या सामाजिक कामांमध्ये काही-ना-काही चालू असतेच.



माझी पत्नी, मुलगा व सून यांच्या बरोबर



**प्रबोधिनी - विद्यार्थी परिषद - व्यवसाय : मागे वळून पाहताना**

प्रबोधिनीचे त्यावेळचे स्वरूप तरी 'class' organisation असे होते. नंतर विद्यार्थी परिषदेशी संबंध आला. ती एक प्रकारे 'mass' organisation होती-आहे. प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांचा ॲव्हरेज आयक्यू जास्त असतोच. Mass organisation मध्ये सर्व वयोगटातील, समाजगटातील, आर्थिक स्तरातील, विविध गुणसंपदेच्या व्यक्ती येतात. त्यांचे संघटन करणे हे आव्हानात्मक काम असते. त्यासाठी पेशन्स हवा. प्रबोधिनीप्रमाणेच 'काम करीत-करीत शिकणे' हे ही परिषदेच्या कामातील सूत्र होते. नंतरही हे सूत्र मी कायम ठेवले. आमची एक उद्योजकांची, उद्योजकांनीच चालवलेली TLC नावाची ॲक्टिव्हिटी आहे. TLC म्हणजे Teaching Learning Community, अशा उद्योजकांच्या एका गटात मी सक्रीय होतो. 'Learning by teaching' and 'knowing by doing' हा TLC चा मोटो आहे. उद्योजकांनीच (नव्या) उद्योजकांना शिकवत जावे, मार्गदर्शन करावे, व त्यायोगे स्वतः ही शिकावे ही त्यामागील संकल्पना आहे. लघुउद्योग भारतीच्या कामातही मी सक्रीय आहे.




संघटनेत असो वा उद्योग-व्यवसायात असो नेत्याची कृती ही त्याच्या सांगण्याप्रमाणेच पाहिजे. 'बोले तैसा चाले' Walk the Talk हे तत्त्व फार महत्त्वाचे. कारखान्यातही एमडी अथवा सीईओच नेता असतो. सर्वजण एका अपेक्षेनेच नेत्याच्या प्रत्येक वर्तनाकडे बघत असतात. मी जनता सहकारी बँक, पुणेच्या संचालक पदावरही आहे. तेथेही KRA, KPA, Accountability ही उद्योगातील सर्वच तत्त्वे लागू पडतात. सर्वच कार्यक्षेत्रात 'मानवीसंबंध' व 'मनुष्यबळ विकास' हा अत्यंत महत्त्वाचा विषय आज झाला आहे. नेत्याने स्वतःच्या कर्तव्याच्या बाबतीत कठोर व प्रसंगी इतरांबाबत काहीसे उदार असे असावे लागते. त्याला संस्थेची/ कारखान्याची core activity नुसती समजून नाही तर तो त्यात तज्ज्ञ असला पाहिजे तरच त्याच्या शब्दाला किंमत राहील. आपल्या सहकाऱ्यांच्या गुणांचे कौतुक सर्वांसमोर करणे पण उणिवा व्यक्तिगत भेटीतच सांगणे अशी 'संघटन-शास्त्रा'तील महत्त्वाची पथ्ये पाळायलाच लागतात.

उद्योग-व्यवसाय चालविताना सरकारी कायदे-कानून, भ्रष्टाचार या बद्दलही अनेकजण विचारणा करतात. माझे एक बेळगावचे मित्र आहेत. त्यांनी No compromise policy जाणीवपूर्वक स्वीकारली, पाळली - म्हणजे कोणताही टॅक्स चुकवायचा नाही व कोणालाही लाच द्यायची नाही. माझ्यापुरते सांगायचे झाले तर आम्ही सहकारी क्षेत्र व सरकारी क्षेत्रात व्यवसाय करत नाही. म्हणजे त्यासाठी आवश्यक असणारी स्किल्स आमच्याकडे नाहीत. You can't isolate yourself. You are playing a game whose rules are not set by you. आमचे बहुतांश ग्राहक फार्मास्युटिकल सेक्टर मधले आहेत.

आज आपल्या देशात लक्षावधी युवक रोजगाराच्या शोधात आहेत. पण दुर्दैवाने त्यातील अनेकांचे शिक्षण व मिळालेल्या पदव्या यांना कागदांच्या कपट्याएवढीच किंमत आहे. त्यांना व्यवहारात, उद्योग-व्यवसाय कसा चालतो, याचे

फारच थोडे ज्ञान असते. Most of them are unemployed because the are 'enemployable'. या सर्वांना आपण कौशल्य शिक्षण कसे देणार आहोत, हा आज मोठा प्रश्न आहे. कोविड १९ नंतर सगळीकडेच नोकऱ्यांवर गदा आली आहे. कंत्राटी कामे देण्याची पद्धत अधिकाधिक वापरली जात आहे व हे वाढणारच आहे. याला उत्तर म्हणजे प्रत्येकाने सतत काहीतरी नवीन शिकत राहणे, One has to be relevant all the time ! माझ्या परिचयातले असे अनेक 'कमी शिक्षित' पण हरहुन्नरी विद्यार्थी आहेत ज्यांच्या बाबतीत असे नक्की म्हणता येईल की इंजिनीअर म्हणून त्यांचे अधिकृत शिक्षण नाही पण कौशल्य त्यांच्याहून जास्त आहे. समाजात अशी शेकड्याने मुले-मुली आहेत. या दुर्लक्षित Unexplored talent ला आपण सतत शोध घेत राहिले पाहिजे व त्यांना आवश्यक ती सर्व मदत देण्याच्या योजना केल्या पाहिजेत. त्यांना संधी उपलब्ध करून द्यायला पाहिजे. आमचा मित्रांचा एक गट आहे, आम्ही जवळपास २२५ मुला-मुलींना गेल्या काही वर्षांत २.५ कोटी रुपयांपर्यंत शिष्यवृत्त्या 'विद्यार्थी विकास योजना' अशा आमच्या उपक्रमांद्वारे दिल्या आहेत, जेणेकरून परिस्थितीच्या जाचामुळे त्यांचे शिक्षण थांबले असे होऊ नये. शिवाय त्या विद्यार्थ्यांना मेंटॉर्स द्यायची योजना कार्यान्वित केली आहे. **प्रत्येक व्यक्तीमध्ये त्याचे सर्वोत्तम पोटेन्शीअल वापरण्याची क्षमता असतेच. आपल्याला त्याला त्याकरिता प्रोत्साहन देता आले पाहिजे. हे समजून सांगताना प्रा. यशवंतराव केळकर नेहमी सांगायचे, की असा कोणताच धातू नाही, जो वितळत नाही. आपला प्रॉब्लेम असा आहे की त्याला वितळायला लागेल एवढी ऊर्जा-उष्णता आपण देऊ शकत नाही !**

आजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, त्यांचे प्रश्न, आंदोलने हे सगळे १९७०-८० च्या दशकापेक्षा पार वेगळे आहेत. आजचा संदर्भाचा पट जागतिक आहे. आज ट्विटरवरून, सोशल मीडियावरून आंदोलने संघटित करता येतात, लोक ती काही प्रमाणात उचलूनही धरतात! त्यामुळे जागरूकताही वाढली आहे, स्पर्धा तर आहेच. या सर्व कल्लोळात - खरे प्रश्न कोणते, मी काय करायला पाहिजे, त्याचा समाजाला कसा उपयोग होणार आहे, त्या कर्तृत्वात मला समाधान वाटणार आहे का, याचा सारासार विचार युवकांनी करायला हवा. प्रबोधिनीने व परिषदेने तो तसा मला शिकवला त्यामुळे ते बीज germ आजपर्यंत टिकून आहे! प्रबोधिनीपासून भौगोलिक अर्थाने मी लांब असलो तरी तो connect आजतागायत तसाच जिवंत आहे. It is a long lasting bond !



**आमची प्रबोधिनीची पहिली तुकडी**

# RAPID FIRE

१. आवडता छंद - बासरी वाजवणे, सिंथेसायझर वाजवणे, संगीत, चित्र काढणे

२. आवडते पुस्तक - खूप आहेत; पण त्यातील एक म्हणजे
Seven Habits of Highly Effective People - Stephen Kovey
वाचनाची खूप आवड प्रबोधिनीपासूनच आहे, ती आजही आहे !

३. आवडता चित्रपट - Roman Holidays, चक दे इंडिया

४. पहिली प्रतिक्रिया -

- विद्यार्थी - प्रचंड शक्तीचा स्रोत व ऊर्जा भांडार
- उद्योग-व्यवसाय - चांगला व्यवसाय करून समाजऋण फेडण्याचा प्रयत्न
- अभाविप - प्रबोधिनीने जशी जीवनदृष्टी दिली तशी देणारी संघटना
- आप्पा - माझे त्या वयातले आदर्श
- ज्ञान प्रबोधिनी - सर्वच भावविश्व व्यापून टाकणारी शाळा, माझे दुसरे घर. दुर्दैवाने पुणे सोडावे लागले (पण प्रबोधिनी मनातून सुटली नाही !)

५. पुन्हा आयुष्य जगायला मिळाले तर काय कराल ?

- सर्व काही उत्तमच झाले! मी अगदी सर्वसामान्य परिस्थितीतून इथवर येऊन पोचलो. अनेक मित्र, मोठा परिवार, चांगल्या संस्था, कर्तबगार व्यक्ती यांच्या परिघात वाढलो. आणखी वेगळे काय हवे !


**विद्यानंद देवधर**
**9822325136**
**vs.deodhar@gmail.com**



**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org